# College Development Committee

| Sr. | Name of Members | Designation | CDC Designation | Tenure |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Rajesh G. Bhoyar | President | Ex- Officio Chairman | Life-Time |
| 2 | Dr. Abhijit V. Verulkar | Secretary | Ex- Officio Member | Life-Time |
| 3 | Prof. K.D Ingole | HOD | Member (nominated by Principal) | 5 years |
| 4 | Dr. Vaibhavi Ughade | Head, Department of Biotechnology | Member(Teachers Representative ) (Women sec) | 5 years |
| 5 | Dr. Hemant .V. Misaal | Department of Arts (Social Science) | Member (Teachers Representative ) | 5 years |
| 6 | Dr. M.B Ingle | Head, Department of Physical Education | Member (Teachers Representative ) | 5 years |
| 7 | Shri V. G Gungrud | Head Clerk | Member (Non-Teaching Representative) | 5 years |
| 8 | Mr. Sandip Petare | Alumni | Member (Alumni) | 5 years |
| 9 | MR. G.R Harbude | Industry | Member( Industrialist) | 5 years |
| 10 | Shri Madhukarrao Palekar | Social Worker | Member ( Social Worker) | 5 years |
| 11 | Dr. A.D Tiple | Researcher | Member (Researcher) | 5 years |
| 12 | Dr. P.M Achegave | IQAC, Coordinator | Member (IQAC) | 5 years |
| 13 | Dr. Ashish.B Sasankar | Principal | Ex-Officio Secretary | 5 years |

Indraprastha New Arts Comm. & Sci. College, WARDHA

PRINCIPAL
Indraprastha New Arts, Commerce & Science College, WARDHA.

# महाविद्यालय विकास समिती सभा

आज दि. १३ मे 2023 रोजी महाविद्यालय विकास समितीची सभा पार पडली. या सभेला खालील सभासद उपस्थीत होते.

| अनुक्रमांक | | क्षेत्र | सभासदाचे नांव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| क | १ | व्यवस्थापनाचे अध्यक्ष | डॉ. आर. जी. भोयर | अध्यक्ष | [signature] |
| ख | २ | व्यवस्थापनाचे सचिव | डॉ. ए. व्ही. चेरूळकर | सदस्य | [signature] |
| ग | ३ | विभागप्रमुख (प्राचार्याद्वारे नामनिर्देशित) | प्रा. के. डी. इंगोले | सदस्य | |
| घ-१ | ४ | शिक्षक प्रतिनिधी (महीला) | डॉ. वैष्णवी उघडे | सदस्य | [signature] |
| घ-२ | ५ | शिक्षक प्रतिनिधी | डॉ. एच. व्ही मिसाळ | सदस्य | |
| घ-३ | ६ | शिक्षक प्रतिनिधी | डॉ. एम. बी. इंगळे | सदस्य | [signature] |
| ङ | ७ | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी | श्री. व्ही. जी. घुगरूड | सदस्य | |
| च-१ | ८ | शिक्षणतज्ञ (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य) | प्रा. संदिप पेटारे (माजी विद्यार्थी) | सदस्य | [signature] |
| च-२ | ९ | उद्योजक (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचारविनीमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य) | श्री. जी आर हरखुडे | सदस्य | [signature] |
| च-३ | १० | समाजसेवक (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचार विनिमय करून नाम निर्देशित केलेले सदस्य | श्री. मधुकरराव पालेकर | सदस्य | M. Paleka |
| च-४ | ११ | संशोधक (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचार विनिमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य | डॉ. ए. डी. टिपले | सदस्य | [signature] |
| छ | १२ | IQAC समन्वयक | डॉ. पी. एम. आन्चेगावे | सदस्य | [signature] |
| ज | १३ | रीक्त | | | |
| झ | १४ | डॉ. आशिष ससनकर प्राचार्य | डॉ. ए. बी. ससनकर | पदसिद्ध सचिव | [signature] |

[signature]
PRINCIPAL
Indraprastha New Arts, Commerce & Science College, WARDHA.

आज दि. १३ मे २०२३ ला झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली व ठराव मंजूर करण्यात आहे.

विषय क्र १. दि ३ डिसेंबर २०२२ ला झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचणे.

विषय क्र २. उन्हाळी २०२२ च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजीत करणे.

विषय क्र. ३. महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करणे.

विषय क्र. ४. आगामी सत्रात महाविद्यालयाचे विविध संस्थांसोब सामंजस्य करार करणे.

विषय क्र ५. महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन करणे.

विषय क्र ६. आगामी सत्रात महाविद्यालयात गांधी तत्वज्ञानावर आधारीत आंतरराष्ट्रीय परीषदेच्या आयोजनाबाबत मते मागविणे.

विषय क्र. ७. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधी २४ वर्षांचा झाल्यामुळे आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा लाभ देण्याबाबत.

आज दि. १३ मे २०२३ ला झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेत खालील ठराव मंजूर करण्यात आले.

ठराव क्र. १. ०३ डीसेंबर २०२२ रोजी झालेल्या सभेचे इतीवृत्त मा. प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी वाचून दाखविले व सर्व सभासदांच्या मौखिक संमतीने ते कायम करण्यात आहे.

Indraprastha New Arts Comm & Sci. College WARDHA

PRINCIPAL
Indraprastha New Arts, Commerce & Science College, WARDHA.

ठराव क्र. २. उन्हाळी २०२२ च्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या परीक्षेत महाविद्यालयातील तब्बल ३६ विद्यार्थी विविध विषयांत गुणवत्ता यादीत आले व त्यांनी महाविद्यालयाचा लौकीक वाढविला. तेव्हा या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र ३. महाविद्यालयाच्या नविन ईमारतीत अद्ययावत सोयी सुविधेसह उभारण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्‌घाटन अनावरण मा. अविनाशजी ब्रम्हाधिकारी निवृत्त आय.ए.एस. अधिकारी यांचे हस्ते करण्याचे ठरविण्यात आले. व हे केंद्र सर्वांसाठी अभ्यासाकरीता खुले करण्यात आले.

ठराव क्र ४. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधन इंटर्नशिप प्रकल्प करण्याकरीता व्यासपिठ उपलब्ध व्हावे या अनुषंगाने परीसरातील विविध शैक्षणिक सामाजिक औद्योगिक संस्थांशी सामंजस्य करार वाढविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव क्र ५. पदवी तथा पदव्युत्तर स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेता त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे महत्वाचे आहे ही बाब लक्षात घेता निकालानंतर महाविद्यालयात रोजगार मेळावा आयोजित करणे ठरविण्यात आले. या संदर्भात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार प्रशिक्षण व उद्योजगता मार्गदर्शन केंद्राशी बोलणी करुन हा उपक्रम संयुक्त रित्याने करता येईल का? यावर सुचना मागविण्यात आल्या.

ठराव क्र ६. कोव्हीड-२०१९ च्या प्रादुर्भावानंतर महाविद्यालयात कुठलिही आंतरराष्ट्रीय परीषद आयोजित करण्यात आली नव्हती आता प्रादुर्भाव ओसरल्याने गांधी तत्वज्ञान अथवा ईतर विषयावर आंतरशाखीय आंतरराष्ट्रीय परीषद २०२३-२०२४ या सत्रात आयोजीत करण्याचे ठरले.

WARDHA Indraprastha New Arts Comm & Sci. College
PRINCIPAL
Indraprastha New Arts, Commerce & Science College, WARDHA.

ठराव क्र.७. महाविद्यालयातील ग्रंथालय परीचर श्री आशिष दि. मेघे, शिपाई श्री राजेश्वर साहुजी दुबडे, कु. सुचिता बी. भोयर, श्री. लिलाधर उईके यांना आश्वासित प्रगती योजनेचा पहीला लाभ मिळून १२ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. त्यामुळे ते आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभासाठी पात्र आहेत. तथापि या चार कर्मचाऱ्यांच्या आश्वासित प्रगती योजनेचा प्रस्ताव तयार करून तो मा. सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावा, असे ही सभा ठरविते.

अंतत: मा. प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी सर्व उपस्थितींचे आभार मानले. व चहापानाने सभेचा समारोप करण्यात आला.

PRINCIPAL
Indraprastha New Arts, Commerce
& Science College, WARDHA.

अध्यक्ष,
महिला विकास संस्था
वर्धा.

Indraprastha New Arts Commerce & Sci. College * WARDHA

# महाविद्यालय विकास समिती सभा

आज दि. १७ जानेवारी २०२४ ला महाविद्यालय विकास समितीची सभा पार पडली. या सभेला खालील सभासद उपस्थीत होते.

| अनुक्रमांक | | क्षेत्र | सभासदांचे नांव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| क | १ | व्यवस्थापनाचे अध्यक्ष | डॉ. आर.जी. भोयर | अध्यक्ष | |
| ख. | २ | व्यवस्थापनाचे सचिव | डॉ. ए.व्ही. वेरूळकर | सदस्य | |
| ग | ३ | विभागप्रमुख (प्राचार्यांद्वारे नामनिर्देशित) | प्रा. के.डी. इंगोले | सदस्य | |
| घ१ | ४ | शिक्षक प्रतिनिधी (महीला) | डॉ. वैभवी उघडे | सदस्य | |
| घ२ | ५ | शिक्षक प्रतिनिधी | डॉ. एच.व्ही. मिसाळ | सदस्य | |
| घ३ | ६ | शिक्षक प्रतिनिधी | डॉ. एम.बी. इंगळे | सदस्य | |
| ड | ७ | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी | श्री. व्ही.जी. घुंगरूड | सदस्य | |
| ड१ | ८ | शिक्षणतज्ञ (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचार विनिमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य) | प्रा. संदिप पेठारे (माजी विद्यार्थी) | सदस्य | |
| ड२ | ९ | उद्योजक (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचार विनिमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य) | श्री. जी.आर. हरकुडे | सदस्य | |
| ड३ | १० | समाजसेवक (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचार विनिमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य) | श्री. मधुकरराव पालेकर | सदस्य | M.Paleka |
| ड४ | ११ | संशोधक (व्यवस्थापनाने प्राचार्यांशी विचार विनिमय करून नामनिर्देशित केलेले सदस्य) | डॉ. ए.डी. टिपले | सदस्य | |
| | १२ | IQAC समन्वयक | डॉ. पि.एस. आचेगावे | सदस्य | |
| | १३ | रीक्त | | | |
| | १४ | डॉ. आशिष ससनकर महाविद्यालयाचे प्राचार्य | डॉ. आशिष बी. ससनकर | पदसिद्ध सचिव. | |

आज दि. १७ जानेवारी २०२४ बुधवार रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेत खालील विषयांवर मंथन करण्यात आले.

विषय क्र. १. दि. १३ मे २०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

विषय क्र २ नॅक मुल्यांकनाच्या तिसऱ्या फेरीसाठी IIQA सादर करणे

विषय क्र ३ विद्यार्थी सहाय्यता निधी २०२३-२०२४ विद्यार्थ्यांना मिळवून देण्याकरीता प्रोत्साहीत करणे.

विषय क्र. ४ महाविद्यालयात शिक्षा आणि कमवा या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

विषय क्र ५. विद्यापिठ संशोधन प्रकल्प योजना २०२३-२४ योजनेकरीता आवेदन सादर करणे करीता प्रोत्साहीत करणे.

आज दि. १७ जानेवारी २०२४ बुधवारला रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेत वरील विषयांवर मंथन करण्यात आले व खालील ठराव घेण्यात आले.

ठराव क्र.१. दि. १३ मे २०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मा. प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी वाचून दाखविले व ते सर्व सभासदांच्या मौखिक संमतीने कायम करण्यात आले.

ठराव क्र. २. नॅक मुल्यांकनाच्या दुसऱ्या फेरीची वैधता १५ ऑगस्ट २०२३ ला संपुष्टात आल्याने मुल्यांकनाच्या तिसऱ्या फेरीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्याकरीता IIQA सादर करून SSR तयार करण्याच्या कामाला गती देण्याचे ठरविण्यात आले.

ठराव क्र. ३ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गरीब, गरजू विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहायता निधी मधून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह भाडे, व जेवणाचा खर्च आदीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. ही योजना विद्यापीठाकडून राबविल्या जाते. सदर योजनेचे आवेदनपत्र खुले करण्यात आले असल्याने या योजनेचा लाभ महाविद्यालयातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्याचे या सभेने ठरविले.

ठराव क्र. ४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ-द्वारे राबविण्यात येणाऱ्या शिका आणि कमवा ही योजना गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिकत असतांना आर्थिक सहाय्य करते. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास निधीतून हे आर्थिक सहाय्य केले जाते. या योजनेचे आवेदन खुले झाले असून महाविद्यालया-तील गरीब, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना या योजने-बाबत अवगत करण्याचे सभेने ठरविले.

ठराव क्र. ५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे शिक्षकांमध्ये संशोधन वृत्ती वृध्दींगत व्हावी, संशोधनास चालना मिळावी यासाठी "विद्यापीठ संशोधन प्रकल्प योजना-2023-24 सुरू करण्यात आली आहे करीता विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील शिक्षकांना ३ लाखांचे तर कला वाणिज्य व व्यवस्थापन शाखे-तील शिक्षकांना २.५ लक्ष रूपयांच्या अनुदानाचे प्रयोजन आहे. सदर योजनेकरीता अधिकाधीक शिक्षकांना आवेदन प्रस्ताव सादर करण्यास प्रोत्साहीत करण्याचे सभेने ठरविले.

अंततः मा. प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले व सभेचा समारोप केला.

PRINCIPAL
Indraprastha New Arts, Commerce
& Science College, WARDHA.

अध्यक्ष,
महिला विकास संस्था
वर्धा.